DEGLOOR COLLEGE, DEGLOOR
AT VYAPARI EDUCATION SOCIETY'S
* Dist.Nanded *

RNI. MAHMUL02937/2010/35848
IMPACT FACTOR - 2.03
ISSN 2229-6190
International Registered & Recognized
Research Journal Related to Higher Education for Social Sciences

# SOCIAL GROWTH

**REFEREED & PEER REVIEWED RESEARCH JOURNAL**

Issue : XII, Vol. II
Year - VI (Half Yearly)
(May 2016 To Oct. 2016)

**Editorial Office :**
'Gyandev-Parvati',
R-9/139/6-A-1,
Near Vishal School,
LIC Colony,
Pragati Nagar, Latur
Dist. Latur - 413531.
(Maharashtra), India.

**Contact :** - (02382) 241913
09423346913 / 09503814000
09637935252 / 07276301000

**Webside**
www.irasg.com

**E-mail :**
interlinkresearch@rediffmail.com
visiongroup1994@gmail.com
mbkamble2010@gmail.com

**Published by :**
JYOTICHANDRA PUBLICATION
Latur, Dist. Latur - 413531 (M.S.)India

Price : ₹ 200/-

**CHIEF EDITOR**

Dr. Balaji G. Kamble
Research Guide & Head, Dept. of Economics,
Dr. Babasaheb Ambedkar College, Latur, Dist. Latur (M.S.) India.

**EDITOR**

Robert Huet
Professor, Dept. Of History,
University of Lowa (USA).

Dr. Laxman Satya
Professor, Dept. of History
Lokhevan University, Lokheavan,
Pensulviya, (USA)

Michael Strayss,
Director,
International Relation & Diplomacy,
Schiller International University,
Paris. (France)

Verena Blechinger Talcott
Director, Dept. of History
& Cultural Studies,
University of Barlin.
Barlin. (Germany)

**EXECUTIVE EDITORS**

B.R. Bobade
Director, Manuscript Dept.,
Deccan Archaeological and Cultural
Research Insititute,
Hyderabad. (A.P.)

Dr. Nilam Sanghani
Borgaon Manju,
Dist. Akola (M.S.)

Dr. Sadanand H. Gone
Principal,
Ujwal Gramin Mahavidyalaya,
Ghonsi, Dist.Latur. (M.S.)

Dr. Omshiva V. Ligade
Head Dept. of History,
Shivjagruti College,
Nalegaon, Dist. Latur.(M.S.)

**DEPUTY-EDITORS**

Dr.Santosh Kute
Chairman, BOS,Economics,
SGB Amravati University,
Amravati, Dist. Amravati (M.S.)

Dr. Karamsingh Rajput
Head Dept. of Economics,
Lokmanya Tilak College,
Vani, Dist. Yavatmal (M.S.)

**CO-EDITORS**

Prof. Veeraprasad
Dept. of Political Science & P. A.,
S.K. University,
Anantpur (A.P.)

Dr. Babasaheb Gore
Principal,
Smt. Sushiladevi Deshmukh Mahila
College, Latur, Dist. Latur.(M.S.)

Dr. P.M. Shinde
Head, Dept. of Sociology,
D.S.M. College,
Jintur, Dist. Parbhani. (M.S.)

Dr. Baban D. Todkar
Head, Dept. Defence Study
New Arts, Sci.& Comm. College
Ahmednagar, (M.S.)

Dr. Anil Chidrawar
I/C Principal
A.V. Education Society's
Degloor College, Degloor Dist.Nanded

RNI.MAHMUL02937/2010/35848
IMPACT FACTOR - 2.03
SOCIAL GROWTH
ISSN 2229-6190
Issue : XII, Vol. II, May 2016 To Oct. 2016

# INDEX



| Sr. No. | Title of Research Paper | Author(s) | Page No. |
|---|---|---|---|
| 1 | Analysis of Poverty | Ramesh Gore | 1-12 |
| 2 | Historical Archeology - With Special Reference to Harppan Civilization | Dr. Vijaykumar Tambare | 13-19 |
| 3 | Mahatma Gandhi and his Philosophy of Religion | Suresh M. Nande | 20-27 |
| 4 | A Comparative Study of Stress on Employees in Call Centers | Dr. Basawaraj, Govindaswamy Cheluvaraj, Anand Siddaiah | 28-40 |
| 5 | Special Economical Zone and Farmers Displacement (Special Reference to Shendra Village) | Dr. Manjusha M. Nalgirkar | 41-47 |
| 6 | भूमी उपयोजन व व्यवस्थापन | महेश सुरेशराव मोरे | 48-52 |
| 7 | भारतीय स्वातंत्र्य लढयात अमरावती जिल्हयातील यावली या खेडेगांवाचे योगदान | अनुप्रिया जगन्नाथ मापारी | 53-56 |
| 8 | बसवेश्वरांच्या कुटुंब व विवाहव्यवस्था | डॉ. रत्नाकर लक्षटे | 57-64 |



Dr. Anil Chidrawar
I/C Principal
A.V. Education Society's
Degloor College, Degloor Dist.Nanded

ADAT VYAPARI EDUCATION SOCIETY'S DEGLOOR COLLEGE, DEGLOOR * Dist.Nanded *

ADARSH VYAPARI EDUCATION SOCIETY'S DEGLOOR COLLEGE, DEGLOOR * Dist.Nanded *

RNI. MAHMUL02937/2010/35846 IMPACT FACTOR - 2.03
SOCIAL GROWTH
ISSN 2229-6190
Issue : XII, Vol. II, May 2016 To Oct. 2016 57

8

# बसवेश्वरांच्या कुटुंब व विवाहव्यवस्था

**डॉ. रत्नाकर लक्षटे**
राज्यशास्त्र विभाग प्रमुख,
देगलूर महाविद्यालय,
देगलूर, जि. नांदेड

*Research Paper - Political Science*

विवाहव्यवस्था हा सामाजिक व्यवस्थेतील एक महत्वाची उपव्यवस्था आहे. जिला भारतीय संस्कृतीत विशेष स्थान आहे. भारतात विवाह एक संस्कार म्हणून ओळखला जातो. बसवकाळातील वैदिक धर्मात विवाह एक पवित्र व धार्मिक संस्कार मानला जाई. बसव काळातील राजे व श्रीमंत वर्गात बहुपत्नीत्वाची आणि विवाह कार्यात वधू बरोबर आंदण म्हणून दासी देण्याची प्रथा होती. ज्याचा उल्लेख स्वतः बसवेश्वरांच्या वचनात आहे.

हातात-झाडू, डोक्यावर बुट्टी (चुंबळ)
सेवकाच्या घरचा पुत्र मी आहे देवा ,
कुडलसंगमदेवाच्या पलंगाबरोबर आलेल्या
सेवकाचा मी पुत्र आहे देवा

बसव काळातील विवाह समयी वधू व वराच्या लग्न-पत्रिका पाहणे, देणे-घेणे (हुंडा पध्दती ) होती. मंडप रचून,तोरन बाधून, नातेवाईक व समाजाच्या साक्षीने व पुरोहीताच्या हाताने वेदिवर चढवून विवाह लावला जात असत. ज्याचे वर्णन अक्कमहादेवीच्या खालील वचनात आहे.

रत्नो की नींव, हेम का तोरण, हिरो के स्तंभ,
मोती का साज, जवाहर का झूमर, मोगरे का छप्पर रच
वेदी पर मेरा ब्याह रचाया स्वजनों ने
कंगन बॉध अक्षता डाल,

RNI. MAHMUL02937/2010/35848 IMPACT FACTOR - 2.03
SOCIAL GROWTH
ISSN 2229-6190
Issue : XII, Vol. II, May 2016 To Oct. 2016 

ADAT VYAPARI EDUCATION SOCIETY'S DEGLOOR COLLEGE, DEGLOOR Dist. Nanded

वर चन्नमल्लिकार्जुन से मेरा ब्याह रचाया !

तत्काळात मुली योग्य पति मिळावा म्हणून व्रत,उपवास करत असत. त्याविषयी देखो! हर ही हो मेरा पति, अत ! अनंत काल तक तपस्य की मैंने ! असे अक्कमहोदवी म्हणत आहे. विवाहसमयी जात-पातीचा विचार करण्याची पध्दत रुढ असल्याचे बसवे□रांच्या खालील वचनातून दिसून येते.

अन्नसेवन आणि वस्त्र वापरताना
त्यांच्या प्रतिज्ञा भंगत नाहीत असे ते म्हणतात
परंतु विवाह जमविताना त्यांचा
जाति विचार उफाळतो.

बसवकाळात स्त्रीयांना वर निवडीचे स्वातंत्र्य नव्हते. अनुलोम विवाह पध्दती अस्तीत्वात होती. धर्मशास्त्रानुसारच विवाह होत असत. बालविवाहाची प्रथा होती. अंतर जातीय विवाह व विधवा विवाहास मान्यता नव्हती

**कुटूंबव्यवस्था व विवाह नैतिकता :**

**अ) कुटूंब व्यवस्था :**

कुटूंब आणी विवाह या समाज व्यवस्थेच्या दोन महत्वपुर्ण संस्था आहेत. महात्मा बसवेश्वरांनी समाजव्यवस्था परिवर्तनाच्या प्रक्रियेत कुटूंब आणि विवाह संस्थेला महत्वाचे मानले. मानवी समाजाचा पाया म्हणजे कुटूंब व्यवस्था होय. समाज शास्त्रज्ञानी कुटूंब संस्थेला समाज व्यवस्थेचा महत्वाचा घटक मानले. व्यक्ति व समाजाच्या सुव्यवसथेला कुटूंबसंस्था कारणीभुत असते. बसव काळात पितृसत्ताक व संयुक्त कुटूंबपध्दती होती. कुटूंब व्यवस्थेत स्त्रियांच्या स्वातंत्र्य व हक्कावर बंधने लादली होती. स्त्रिला कुटूंबात दुय्यम स्थान होते. कौटूंबीक वातावरण कलहाचे असत. संसार ही 'माया' समजुन कुटूंब सोडून 'संन्यास' घेण्याची प्रथा होती यामुळे कुटूंबातील इतर सदस्यावर उपासमारीची वेळ येत असत. निवृत्तीच्या नावावर कौटूंबिक जिवन नाकारणारे लोक स्वतः व इतरांनाही परावलंबी बनवतात. ज्यामुळे कुटूंबसंस्था विस्कळीत होते. बसवादीशरणांनी संन्यासाच्या नावाने संसारापासून पलायन करण्याचा मार्ग सोडून कौटूंबिक (सांसारीक) जिवनातच कर्तव्यनिष्ठ राहुन अध्यात्म साधने शक्य आहे असे सांगितले. परमार्थाकडे पुर्ण पाठ फिरवुन गृहस्थि चालविण्याचा गृहस्थाश्रम दुःखाचा होतो. बायका मुलासाठी पैशाचा हव्यास करु नये. प्रत्येक कुटूंबाने पोटापुरतेच कमवावे व स्विकारावे. "माझ्या पोटाकरीता माझ्या वस्तु, बायको मुलाकरीता केल्यास चिंता मज मणास मनाचीच साक्ष ।" कौटूंबिक विचारा बसवेश्वरांनी 'संन्यास' सुचक शब्दही वापरावयाचे टाळले. म्हणुनच दासोह किंवा आश्रम स्थानाला 'महामने' नाव दिले. मने म्हणजे 'घर', महामने

ADARSH VYAPARI EDUCATION SOCIETY'S DEGLOOR COLLEGE, DEGLOOR * Dist.Nanded *



म्हणजे 'मोठे घर'. त्याला त्यांनी 'मठ' 'प्रासाद' इ. नाव दिले नाही. कारण ते नाव 'संन्यास' सुचक आहेत. आपण समाजात राहुन, स्वाभाविक सहज जिवन जगत कौटुंबिक, सामाजिक तथा राष्ट्रीय ऋण चुकवू शकतो. महात्मा बसवेश्वरांनी कुटूंबातील कलह, आळसीवृत्ती दुर करणे गरजेचे मानले. कुटूंबातील सती-पती परस्परपणे आपापल्या व्यक्ती स्वातंत्र्यास, व्यक्ती विकासास धक्का न लावता जगणारे असावेत. कौटूंबिक व्यवस्थेविषयी शरण जेडरदासीमय्याचे खालील वचन सुचक आहे.

" सती पतीची भक्ती एकरुप असेल तर
ते दोघे मिळुन करीत असेल तर
ती भक्ती देवास अत्यंत प्रिय आहे.
सती पतीची भक्ती एकरुप नसेल भिन्न असेल तर
त्यास भक्ती न म्हणता विष अमृतामध्ये मिसळल्याप्रमाणे होय."

प्रस्तुत वचनात 'भक्ती' हा शब्द 'दाम्पत्य जिवनाशी ' संबंधीत या अर्थाने घेवुन पहावे म्हणजे उलगडा होईल. अध्यात्म साधनेतील गृहस्थ धर्माचे महत्व सांगितले. बसव तत्वात संसार माया नाही. संसारी कनिष्ठ व संन्यासी श्रेष्ठ असाही भेद नाही. महात्मा बसवेश्वरांच्या दिव्य वलयी नेतृत्वामुळे कुटूंब या सामाजिक संस्थेत मुलभूत परिवर्तन झाले. बसव तत्वात गुरु, लिंग-जंगमाची सेवा करणे हे प्रत्येक कुटूंबाचे परमकर्तव्य आहे. कायकामध्ये मग्न असलेल्या शरणाने गुरुलिंग जंगमाची सेवा करणे क्षम्य मानले. कायक जेवी कुटूंबाचे स्वप्न पाहिले. कुटूंबात पती पत्नी एकमेकाविषयी आदरभाव व्यक्त करु लागले. पत्नीला सहचारीणीचा दर्जा मिळाला. पतीच्या व कुटूंबाच्या सामाजिक व धार्मीक कार्यात पत्नीचे स्थान महत्वपुर्ण बनले. आपल्या पतीविषयीचा भाव बसव पत्नी 'निलांबीका' तिच्या खालील वचनात व्यक्त करते.

" मजलिंग तुम्हीच बसवय्या, मला संगय्या तुम्हीच बसवय्या
माझा प्राणही तुम्हीच बसव, मला संगय्या तुम्हीच बसव
मला प्रभामय मुर्ती तुम्हीच बसव
मला संगय्याही (परमेश्वर) तुम्हीच बसवय्या"

बसवेश्वरांनी कुटूंबात पत्नीस सेविकेचा (दासी) भाव न देता अर्धांगीणीचा भाव दिला आहे. स्त्रियासोबत पतीनेही एक पत्नीत्वाचे बंधन पाळावे.

"आरध्य प्राणलिंगी या जाणिवेनंतर
पुर्वगूण नष्ट होवुन पुर्नजन्म झाल्यावर
संसारातील सगे सोयरे आपले मानले तर,

ADAT VYAPARI EDUCATION SOCIETY'S DEGLOOR COLLEGE, DEGLOOR * Dist.Nanded *



नात्यांची भक्ती ही रौख नरक,
असे म्हणले कुडलसंगाचे वचन"

समाज हेच माता-पिता, समाज हेच सगे-सोयरे हा उदात भाव बसवेश्वरांच्या वरील वचनातुन व्यक्त होतो. कौटूंबिक नात्यांना व हितसंबंधांना जपणारी भक्ती खरी नसते. त्या भक्तित समाज विषयीचा कळवळा नसतो. म्हणुन नात्याच्या भक्तीला रौख नरका समान मानुन, वैश्विक समाजच आपले कुटूंब मानले. बसवेश्वरांचे समाज परिवर्तनाच्या काळातील बहुसंख्य सहकारी शरण कौटूंबीक, संसारीच होते. उदा. मोळगी मारय्या-त्याची पत्नी , शरणहरळय्या , शरणी कलावती इ. बसव प्रणित कुटूंब व्यवस्थेत स्त्रि पुरुषांना समान स्वातंत्र्य, संधी व हक्क होते. आपला पती स्वार्थ भावनेने एका दिवशी अधिकचे तांदुळ वेचुन आणतो. तेंव्हा त्याची पत्नी आयदक्की लक्कम्मा त्यास मार्गदर्शन करुन त्याच्यातील कायक व दासोहाप्रतिचा सद्‌भाव जागृत करते. याचा अर्थ बसव समाजातील कुटंबव्यवस्थेत स्त्रि विचाराला स्वातंत्र्य होते. कुमार स्वामीजींच्या मते "

कुटूंबाबद्दल बसवेश्वरंच्या मनात अतिव प्रेम होते. त्यांनी सर्व मानव समाजालाच कुटूंब मानले. " सारे विश्व एक कुटूंब, सर्व लोक एका कुळाचे अशी सृष्टीकर्त्याची इच्छा आहे हा विचार बसवेश्वर मांडतात. बसवकालीन शरण सिध्दारामेश्वरांनी कुटूंब कसे असावे याविषयी आपले विचार खालील वचनातुन मांडले

"घर बघुन आत जावंस मनासी वाटावं
तिथले लोक पाहता किर्तीवंत असावेत,
संगनबसवग्रही प्रवेश केला तर ,
आपुल्या मनाशी निरसुन
बसवण्णासारखे मनोरथ व्हावे
कपिलसिध्द मल्लीकार्जुना"

महात्मा बसवेश्वरांनी समान हक्क कुटूंब पध्दती अंमलात आणली. " मम पिता थोर मातंग चन्नय्या, पिताभह वीर डोहार कक्कय्या, चिक्कय्याशी जाण आपुलाची अय्या, धन्य मम बंधु, संत हरळय्या " अशी बसवेश्वरांची कुटूंब व्यवस्था होती.

"काय हो आलात, या क्षेम कां ? अशी विचारपुस केल्यास ।
झडेल का तुमच्या शरिरावरील मांस ?
तडेल का जमीन या बसा म्हंटल्यास ?
फुटेल का मस्तक, पोट त्वरीत बोलल्यास ?

ADAT VYAPARI EDUCATION SOCIETY'S DEGLOOR COLLEGE, DEGLOOR * Dist.Nanded *



द्यावयास काही नसल्यास सदगुण तरी नको का ?

कुडलसंगमदेव अशांचे नाक कापल्याशिवाय राहील का ?"

उपरोक्त वचन कौटूंबिक शिष्टाचार स्पष्ट करणारे आहे. कुणी आपल्या घरी भेटायला अगर काही कामानिमीत्य आले असता "या आलात सर्व ठिक आहे ना ? सर्व कुशल आहे ना ?" असे विचारणे शिष्टाचारच आहे. हे सोडून आपल्याकडे आलेल्यांच्याकडे दुर्लक्ष केल्यास आलेल्यांचा अपमान होत नाही का ? असे वागणे म्हणजे शिष्टाचार सोडल्यासारखेच होय. म्हणुन बसवण्ण कडक शब्दात विचारतात "आलेल्याची साधी विचारपुस केल्यास तुमच्या शरीरावरील मांस झडेल का ?" व्यक्तीच्या सहजिवनाला पायाभुत असलेले कुटूंब, सामाजिक स्थिरतेबरोबरच नैतिक व धार्मिक स्थिरता ही प्राप्त करुन देते असे बसवादी शरणांचे स्पष्ट मत होते. 'महात्मा बसवेश्वरांनी 'महामनेच्या' माध्यमातुन विश्वकुटूंबाची कल्पना वास्तवेत आणण्याचा प्रयत्न केला' असे अल्लमप्रभुदेव म्हणतात. ज्याचे शरीर शुध्द, मन शुध्द, त्याचे आचार, त्याची वाणी शुध्द असुन सर्वत्र पवित्र होय; असल्या सदभक्तांचे घरच कैलास होय. देवा तुमचे शरण नसलेले घर ते घरच नव्हे. जेथे तुमचे शरण असती तेच खरे गृह असे. कल्याणच्या प्रत्येक घराघरातुन आपलेपणाचा कौटूंबीक सुगंध दरवळत होता. बसवादी शरणांनी स्वेच्छाचारी लैंगीक प्रवृत्तीवर मात करुन; त्यास तुच्छ लेखले; स्वतःस त्याचे गुलाम होवु दिले नाही. तर कौटूंबिक चौकटीमध्ये राहुनच लैगिंक उपभोग घ्यावा. प्रा.मधुकर रोडेच्या मते "महात्मा बसवेश्वरांची गणना विश्व महापुरुषात होते कारण त्यांचे कार्य 'वसुदैवकुटूंबकम' स्वरुपाचे होते "

**ब) विवाह नैतिकता :**

बसवेश्वर काळात विवाह हा एक प्रमुख संस्कार होता. विवाह संस्काराला वैदिक धर्मप्रणित नियमानी बंदीस्त केले होते. तत्काळात विवाह म्हणजे स्त्रि पुरुषांचे संम्मीलन, कामतृप्तीसाठीचा परवाना असाच अर्थ होता. उच्चवर्णीय व शुद्रांचे विवाह पध्दती व नियम वेगवेगळे होते. उच्चवर्णियांनी स्वहित संरक्षणासाठीच विवाहनियम व पध्दतीची रचना केली होती. बालविवाह होत असत. विधवा विवाहास मान्यता नव्हती. सतीप्रथा पध्दती अस्तित्वात होती. असंख्य अनैतिक, अनितीमान नियमांनी विवाह संस्काराला वेढलेले होते. उदा. विवाह करताना शुभ, अशुभ मुर्हूत पाहणे, लेन-देन (हुंडा पध्दती), कुळ शोधणे, होम हवन, अग्नी व सप्तपदी म्हणत. बहुपत्नीत्व पध्दत होती. स्त्रियांच्या वैवाहीक स्वातंत्र्याला बंदिस्त केले होते. धार्मिक संस्कार म्हणून होणाऱ्या पण अमानवीय स्वरुपाच्या विवाह संस्काराविषयी बसवेश्वरांनी सखोल चिंतन व चिकीत्सा केली. विवाहाविषयीची तत्कालीन कल्पना नाकारुन संसार करुन परमार्थ साधावा. व्यक्तीने विवाहीत राहुन नैतिक मुल्यांची जोपासना

करणे आवश्यक मानले. वैवाहीक जीवन स्विकारुन मन स्वस्थ ठेवून सर्व सुखोपभोग घेणे हे विचारशिल व्यक्तिला योग्य वाटले तरी चुकीचे नाही. समाज स्वास्थासाठी विवाह उपयुक्त आहे. डॉ. शाजेरायण्णांच्या मते " बसवाच्या मते विवाह करुन वैषयिक सुख उपभोगणे हे पाप नाही, परंतु वैषयिक नजरेने इतर स्त्रियांकडे पाहणे मात्र पाप आहे." बसवेश्वरांच्या मते विवाह हा एक पवित्र संस्कार आहे. समाज सुव्यवस्थित व शांततामय रितीने चालण्यास विवाहक्रिया अत्यंत आवश्यक आहे. बसव धर्मात जन्मापासुन मृत्यूपर्यंतचे सर्व संस्कार वचनाआधारीतच व्हावेत. विवाह मानवाच्या निसर्गधर्मास आवश्यक असा एक संस्कार आहे. या संस्कारास मानवता, नैतिकता व समता इत्यादी मानवी मुल्यांची आधुनिक झालर बसवेश्वरांनी दिली. अवडंबरयुक्त अंधश्रध्दा आणि शोषणाच्या जोखडातुन या संस्कारास मुक्त केले. "गुरु पादोदक हेच मंगल स्नान माझे, विभुती हीच कांतीयुक्त हळद माझी

दिगंबर हेच दिव्यांबर वस्त्र माझे, शिवभक्तांची चरण धुळ हे अनुलेपन माझे
रुद्राक्ष हेच दिव्य अलंकार माझे, शरण पादुका हेच बाशिंग माझे.

चन्नमल्लिकार्जुनाच्या वधुला वेगळा श्रृंगार कोणता सांग बाई " गुरु, पादोदक, विभुती, रुद्राक्ष, शरणपादुका इ.चा वधुने विवाह समयी श्रृंगार म्हणुन उपयोग करावा असे अक्कमहादेवींने वरील वचनात स्पष्ट केले. विवाहात प्रत्येकास जोडीदाराची निवड करण्याचे स्वातंत्र्य असावे. परस्परांनी एकमेकास समजुन घेवुनच विवाह करण्यात हित आहे. यामुळे परस्परात प्रिती, प्रेम, विश्वास, नैतिक सदृढता व स्थैर्य निर्माण होते. विवाह करताना जाती, मत , पंथ इत्यादीचा विचार करु नये . विधवा होणे पाप नसुन ती एक आकस्मिक घटना मानले. महात्मा बसवेश्वरांच्या या विवाह विषयक नैतिक व क्रांतीकारक विचाराविषयी पद्मश्री बाळासाहेब पाटील (संपादक दै.सत्यवादी, कोल्हापूर, २१ एप्रिल १९७७) म्हणतात. " बसवेश्वररांनी स्त्रियांना पुरुषाबरोबरचे सर्व हक्क बहाल केले. इतकेच नव्हे तर पुरुषांच्या बरोबरीने स्त्रियांना आत्मकल्याण करुन घेण्याचा अधिकार आहे असे प्रतिपादन करुन तशी प्रत्यक्ष कृतीही त्यांनी केली. प्रौढ विवाह, विधवा विवाह या विवाह प्रकारांना बसवेश्वरांनी पुष्टी दिली."

"शिवशरण एकत्र येता शुभ लग्न समजावे
हाच उत्तम मुहूर्त, हाच शुभ मुहूर्त सांगावे
हाच चंद्रबल, हाच तारावल म्हणुन सांगावे
उद्यापेक्षा आजचा दिवस चांगला सांगावे
हेच लिंगदेवाच्या पुजेचे फळ समजावे "

ADAT VYAPARI EDUCATION SOCIETY'S DEGLOOR COLLEGE DEGLOOR * Dist.Nanded *

ADAT VYAPARI EDUCATION SOCIETY DEGLOOR COLLEGE, DEGLOOR * Dist.Nanded *



उपरोक्त वचनातुन महात्मा बसवेश्वरांनी त्या काळातील विवाह मुहूर्त पाहण्याच्या पध्दतीची चिकीत्सा करुन, सर्वांची मने व मत एक झाल्यास व सर्वांना वेळ असता एकत्र जमुन विवाह करावा. विवाहासाठी हाच शुभ मुहूर्त आहे असे समजावे.

" लिंगभक्ताच्या विवाहामध्ये शिवशरणांना विभुती, वेळ देवुनी आमंत्रित करावे
शिवशरणांच्या साक्षीने प्रसाद दयावा हा सदाचार नाही तर -
वार तिथी मुहूर्त असे लौकीक कर्म केले असता तर
तुमच्या सदभक्तापासुन दुर होईल कुडलचन्नसंगमदेवा "

चन्नवसवेश्वरांनी लिंग भक्तरुपी मानवाच्या विवाहाची रित सांगितली. लिंगभक्तानी विवाहात वार, तिथी, मुहूर्त इ. वैदीक किंवा लौकीक कर्म केल्यास कुडलचन्नसंगमदेवा दुर जाईल असे सांगितले. चन्नब्बसवेश्वराचा हा विचार विवाहात होणाऱ्या अंधश्रध्दा व कर्मठक्रियांना तडा देणारा आहे. विवाह करणारे वर-वधु आणि त्यांचे आई-वडील, भाऊ - बहिण यांची विवाहास मान्यता असेल तर सर्व ग्रह, तारे इत्यादीचे बळ मिळण्याच्या समान आहे शरणांची संमती असेल तर विवाह करावा. गुरुलिंग जंगम इ.ची पुजा करुन आणि शिवशरणांना दासोह करुन सर्वांच्या साक्षीने वधुच्या गळयात वराकडून मंगळसूत्र बांधणे हीच बसव धर्मात (समाजात) विवाहाची पध्दत आहे. ज्यास 'सरल विवाह पध्दती' म्हणतात. हुंडा पध्दती नाही. विवाहात अवडम्बर नसावे. विवाह सोहळा एकाच दिवसात कांही तासात पुर्ण व्हावे. संस्कृत मंत्राऐवजी वचनांचा उपयोग करावा. विवाहप्रसंगी रुढी परंपरांचे पालन नाही केले तर ईश्वर कोप होईल, दैवी संकट कोसळेल असे म्हणणाऱ्यांना बसवेश्वर खालील वचनात म्हणतात

" लग्न कुठले , विधी कुठले संगय्या ?
दोष कुठला, संकट कुठले संगय्या ?
तुमच्यावर श्रध्दा असणाऱ्यांना भव-कर्म कुठला ?
लिंग देवय्या "

विवाहसमयी स्वतःच्या किर्तीसाठी अवडंबर माजवणाऱ्यास बसवेश्वर म्हणतात " किर्तीसाठी व्यय केलेले धन वृथाच गेले ना ? " तत्कालीन विवाह पध्दती नाकारुन अंतरजातीय विवाह, प्रतिलोम विवाह, विधवा विवाह पध्दतीचा स्विकार बसवेश्वरांनी केला. "अग्रज-अंत्यज वर्ण धर्मातील दोन ध्रूव
एक उत्तर-तर एक दक्षिण
ध्रुव दोन्हीत फार मोठी दरी

भक्ती अनुरागाचे वारा पाहुन प्रेमसुत्राने दोन्हीस बांधले.
अग्रजाची पुत्री अंत्यजाच्या पुत्राला वरली
मानवतेची महासिध्दी शरणांनी साधिली
निःकलक मल्लिकार्जुन हे पाहुन मी स्तंभित झालो."

वरिल वचनात १२ व्या शतकात महात्मा बसवेश्वरांनी लावलेल्या आंतरजातीय विवाहाचा उल्लेख दिसुन येतो. जाती व्यवस्था नष्ट करण्यासाठी आंतरजातीय विवाह सर्वोत्तम उपाय आहे. यासाठी भारतीय संविधानात डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी आंतरजातीय विवाहाचे समर्थन केले आहे. १२ व्या शतकात महात्मा बसवेश्वरांनी आंतरजातीय विवाहाची क्रांतीकारक पाऊल उचलले आणि आपल्या समताधिष्ठित समाज रचनेचे स्वप्न साकार केले.

## संदर्भ सूची

१. डॉ. अशोक कामत (१९९१) : महात्मा बसवेश्वर- काळ, व्यक्ती, वचन साहित्य आणि शरणकार्य - सत्संग प्रतिष्ठाण, पुणे -

२ माते महादेवी (अनुवादक - शालीनीताई दोडमनी) (प्रथमावृत्ती १९९७) - कल्याणक्रांती बसवधर्माचे महाजगद्गुरु पीठ कुडलसंगम ता.हुनगुंद जि.विजापूर.

३ R. C. Hiremath (1967) : Sri Basvesvara ! A Biography - Published in Sri Basveswara - A communication Volume - Bangalore.

४ डॉ. भगवानदास तिवारी (प्रथमावृत्ती - २००१) : विश्वमानव बसवेश्वर - बसव शांती मिशन प्रकाशन, धारवाड -.

५.) कृष्णा मेनसे (तृतीयावृत्ती २००५) : श्री बसवेश्वर ते श्री. ज्ञानेश्वर- एक चिंतन - लोकवाङ्मय गृह, मुंबई

Dr. Anil Chidrawar
I/C Principal
A.V. Education Society's
Degloor College, Degloor Dist.Nanded